# मॉडर्न हायस्कूल, गणेशखिंड शाळेने पटकावला 'सायबर फेअर' करंडक



**पुणे :** पंख संस्था, क्विकहिल फाउंडेशन आणि पुणे शहर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण व जीवनमूल्य शिक्षण प्रकल्पांतर्गत सायबर फेअर हा स्पर्धात्मक कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये शाळांगण व जीवनमूल्य प्रशिक्षण प्रकल्प सुरु असणाऱ्या एकूण अकरा शाळा व महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. यामध्ये मॉडर्न हायस्कूल, गणेशखिंड रस्ता यांनी 'सायबर फेअर' पुरस्कार पटकावला

तरुणांमध्ये वाढत असलेला इंटरनेटचा वापर व त्यामुळे घडणारे सायबर गुन्हे याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी हा या कार्यक्रमामागील उद्देश होता.

स्पर्धेत मुलांनी इंटरनेट शाप की वरदान, इंटरनेटचे फायदे व तोटे, इंटरनेटचा सुरक्षित व जबाबदार वापर या सायबर संबंधित विषयांवर निबंध लेखन, घोषवाक्य, पोस्टर, छोटी नाटिका, रॅप, स्टँडअप, ऍप कॅरेक्टर्स अशा विविध गोष्टींचे सादरीकरण केले. यामध्ये मुलांना प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ आणि विशेष अशी अनेक बक्षिसे मिळाली.

प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपआयुक्त बच्चन सिंह, गुन्हे कलाकार अजय पूरकर, अध्यक्ष क्विकहिल टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष कैलास काटकर उप-स्थित होते. पुणे शहर सायबर सेल प्रमुख जयराम पायगुडे, सायबर सेल पोलीस निरीक्षक मछिंद्र पंडित, झख सागर पानमंद व कुलदीप दगडे, स्पर्धेचे परीक्षक होते.

अजय शिर्के, पंख संस्थेच्या अध्यक्ष स्मिता आपटे, कल्याणी भाबड, सीमा ननावरे, दीपक मराठे, चित्तरंजन कांबळे, झड्ख बबन गायकवाड, तसेच शिक्षक, विद्यार्थी व पालक, भरोसा सेल व सायबर सेल पुणे शहर, येथील पोलीस अधिकारी हे कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

सूत्रसंचालन कल्याणी भाबड यांनी केले, तर स्पर्धांचे सूत्रसंचालन पंख समुपदेशक ज्योती काटिकर यांनी केले. स्मिता आपटे यांनी आभार मानले.